आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२२ मे २०२४ - बुधवार

भारताची अर्थव्यवस्था आता आगेकूच करण्याच्या महत्वाच्या टप्प्यावर पोहचली असल्याचा आशावाद रिझर्व्ह बॅंकेच्या मे महिन्याच्या मासिक पत्रिकेतील एका लेखात व्यक्त करण्यात आला आहे. रिझर्व्ह बॅंकेचे डेप्युटी गव्हर्नर मायकल देवव्रत पात्रा यांच्या नेतृत्वा खालील चमूने लिहीलेल्या या लेखात बाजारात उत्पादनाची मागणी वाढू लागल्याची ठसठशीत चिन्हे दिसू लागल्याचं तसंच  गेल्या २ वर्षात पहिल्यांदाच ग्रामीण भागात मागणी वाढू लागल्याचं म्हटलं आहे . २०२३-२४ या आर्थिक वर्षात तिमाही महसुलात ऊच्चांकी वाढ झाली असून मार्च २०२४ पासून त्यात आणखी वाढ होत आहे असही या लेखात नमूद करण्यात आल आहे .

**<><><><><>**

मुंबईतल्या घाटकोपर इथं होर्डिंग कोसळून झालेल्या अपघाताच्या तपासासाठी गुन्हे अन्वेषण विभागानं विशेष तपास पथक स्थापन केलं आहे. या पथकात सहा अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली आहे. या अधिकाऱ्यांनी अपघाताला कारणीभूत असणाऱ्या भावेश भिंडे याच्या घराची झडती घेतली. गेल्या आठवड्यात झालेल्या या अपघातामध्ये सतरा जणांचा मृत्यू झाला होता तर ७५ जण जखमी झाले होते.

**<><><><><>**

पुण्यात कल्याणीनगरमधे झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर पुणे प्रादेशिक परिवहन विभागानं विनानोंदणी वाहनांवर कारवाई सुरू केली आहे. रस्त्यावर अशी वाहनं दिसली तर त्यांची विक्री करणाऱ्या वितरकाचा व्यवसाय परवाना १५ दिवसांपासून ते ६ महिन्यांच्या कालावधीसाठी

निलंबित होईल अशी माहिती पुण्याचे प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी दिली.

शहरातल्या सर्व पब्ससह इतर परमिट रूमची विशेष तपासणी मोहीम राज्य उत्पादन शुल्क विभागानं हाती घेतली आहे. नियमांचं उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांचे मद्य विक्रीचे परवाने निलंबित किंवा रद्द होतील अशी माहीती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुणे विभागीय उपआयुक्तांनी दिली.

दरम्यान, या अपघात प्रकरणातल्या आरोपीला बालहक्क न्यायालयासमोर आज हजर करण्यात आलं. दारू पिऊन कार चालवल्याबद्दल कलम १८५ अंतर्गत नव्यानं गुन्हा त्याच्यावर दाखल करण्यात आला आहे.

<><><><><>

लातूर शहर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागानं मान्सूनपूर्व नाले सफाईची मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत आतापर्यंत ६ मोठ्या आणि ४० छोट्या नाल्यांची स्वच्छता करण्यात आली आहे. उर्वरित सर्व लहान मोठ्या नाल्यांची स्वच्छता ७ जून पूर्वी केली जाईल, अशी माहिती महापालिकेच्या उपायुक्तांनी दिली.

<><><><><>

छत्रपती संभाजीनगर शहरात मान्सूनपूर्व नालेसफाईचं काम एप्रिल महिन्यापासून सुरू झालेलं असून, आतापर्यंत सुमारे पंचाहत्तर टक्के काम पूर्ण झालं आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी, नागरिकांच्या याबाबतीतल्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत.

**<><><><><>**

पुणे जिल्ह्यातल्या इंदापूर तालुक्यात उजनी धरणात प्रवाशांना घेऊन जाणारी एक बोट काल वादळी वाऱ्यांमुळे बुडाली. या बोटीतून प्रवास करणाऱ्या आठ जणांपैकी एक प्रवासी पोहत आल्यानं बचावला. राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाच्या शोधकार्यात अपघातग्रस्त बोट सापडली.

नाशिक जिल्ह्यात इगतपुरी तालुक्यातल्या भावली धरणात काल संध्याकाळी पाचजणांचा बुडून मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन मुलं आणि तीन मुलींचा समावेश आहे. सर्वाचे मृतदेह सापडल्याचं समजतं.

**<><><><><>**

नेपाळच्या पाणी पुरवठा आणि जलसंधारण विभागाच्या वीस जणांच्या अभ्यासगटानं काल हिवरेबाजारला भेट दिली. गावातल्या पाणी समस्या सोडविण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची तसंच गावातल्या विकास कामांची त्यांनी पाहणी केली. राष्ट्रीय जल अकादमीचे संचालक मिलिंद पानपाटील यांनी या भेटीचं नियोजन केलं होतं.

**<><><><><>**

राज्यात येत्या तीन दिवसांत तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

मराठवाड्यात अनेक ठिकाणी वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

रत्नागिरी जिल्ह्याच्या काही भागात काल रात्री विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह पाऊस पडला.

<><><><><>

देशाच्या सागरी सीमांशी संबधित हितरक्षणासाठी भारतीय नौदल नेहमी सुसज्ज असणं आवश्यक आहे असं प्रतिपादन नौदल प्रमुख दिनेश त्रिपाठी यांनी केलं. ते नवी दिल्ली इथं नौदल मुख्यालयात नौदल अधिकाऱ्यांना संबोधित करत होते. भारतीय नौदलाने आत्मनिर्भर होण्यावर भर दिल्याचं ते म्हणाले. सध्याच्या तसंच भविष्यातल्या आव्हानांवर मात करण्यासाठी नौदलाने अत्याधुनिक आणि स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर केला आहे असं त्यांनी सांगितलं. नौदल कर्मचारी सेवेत समर्पणवृत्ती आणि व्यावहारिकता यांचा मेळ साधत असल्याची त्यांनी प्रशंसा केली.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवण्याचा भाजपाचा दावा पूर्णपणे काल्पनिक आहे आणि भाजपाला २०१९ च्या निवडणुकींसारखे निकाल यावेळी मिळणं निव्वळ अशक्य आहे, असं मत काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी आज नवी दिल्ली इथं बातमीदारांशी बोलताना व्यक्त केलं.

//<><><><><>//